वेळ : २.३० तास		गुण :७५

प्र.१ अ) ललित कला म्हणजे काय? ते सांगून साहित्याचा आशय आणि साहित्याची अभिव्यक्ती या संज्ञांचा परिचय करुन द्या. (१५)

किंवा

ब) इतर ललित कलांपासून साहित्याचे वेगळेपण स्पष्ट करुन साहित्य आणि दृश्यकला यांचा परस्पर संबंध सविस्तर लिहा.

प्र.२ अ) साहित्य हे वाचक आणि समाजमनावर कोणत्या प्रकारचा संस्कार करते, ते सोदाहरण स्पष्ट करा. (१५)

किंवा

ब) "साहित्याच्या जडणघडणीत समाज आणि संस्कृती महत्त्वाची भूमिका बजावतात," सोदाहरण चर्चा करा.

प्र.३ अ) समाज आणि संस्कृती या संकल्पनेची चर्चा करुन साहित्याच्या आस्वादासंदर्भात भारतीय साहित्यशास्त्रज्ञांची मते सविस्तर लिहा. (१५)

किंवा

ब) संस्कृती म्हणजे काय ते स्पष्ट करुन संस्कृतीतील तीन महत्त्वाचे घटक लिहा.

प्र.४ टीपा लिहा. (प्रत्येक गटातील एक) (१५)

अ) साहित्य-एक ललित कला

किंवा

ललित कलांचे प्रकार

ब) 'कविता' या साहित्यप्रकाराचे स्वरुप

किंवा

साहित्याचे प्रमुख प्रकार

क) संस्कृतीतील तीन महत्त्वाचे घटक

किंवा

साहित्य आणि संस्कृती : परस्पर संबंध

प्र.५ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही पाच) (१०)

१. साहित्याच्या मुलभूत घटकांची नावे लिहा.

२. अलंकार म्हणजे काय?

३. साहित्याचे माध्यम कोणते?

४. 'साहित्य ही स्वभावत: वादग्रस्त संकल्पना आहे' असे कोणी म्हंटले आहे?

PQ10ABV

५. आशयविरहीत रचना ही साहित्यात कशी म्हणावी लागेल ?

६. आनंदवर्धनाने कोणते मत मांडले ?

७. साहित्याच्या माध्यमाची दोन वैशिष्ट्ये सांगा ?

८. दृश्यकला कोणकोणत्या आहेत ?

ब) योग्य पर्याय निवडा (५)

१. प्रा. गंगाधर पाटील यांनी साहित्याची ................ अंगे सांगितली आहेत.

१) सहा २) दहा ३) सात

२. ॲरिस्टॉटल व ............ यांनी कलांची चर्चा करताना चित्रकाराला सुतार, शिंपी, जहाज बांधणारा इत्यादी कारागीरांपैकी एक मानलेले आहे.

१) आनंदवर्धन २) प्लेटो ३) कोलरिज

३. इंग्लंडमध्ये हॉब्ज व ............... या तत्त्वज्ञांचे कार्य ज्ञानविषयक संकल्पनांमध्ये महत्त्वाचे आहे.

१) ॲरिस्टॉटल २) प्लेटो ३) लॉक

४. साहित्य हा संस्कृतीचा ............ असतो.

१) आरसा २) कणा ३) आशय

५. फाईन आर्टस् हा शब्दप्रयोग ........... व्या शतकात निर्माण झाला.

१) सतराव्या २) सोळाव्या ३) अठराव्या

❀❀❀